*बांबू हॅडीक्राफ्ट आणि आर्ट युनिट स्थापनेबाबत..*

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## राहुरी, जि. अहमदनगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र. एमटीजी-३ (६८९)/१६०/२०१८ दि. २६ सप्टेंबर, २०१८

**वाचा** - १. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा.क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५७/फ-९, दि. १७ मे २०१८

२. संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर (महाराष्ट्र) यांचे पत्र जा.क्र. कक्ष-३ खर्च/प्र.क्र.१७/१५-१६/१०५/१८-१९, दि. २४/०५/२०१८

३. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे पत्र जा.क्र. जिनिस/जिवायो/१८-१९/प्रमा/संस-४/१४९८, दि. १८/०६/२०१८

**पार्श्वभूमी -**

मागील काही दशकांमध्ये दैनंदिन जीवनातील बांबूचे महत्त्व आधुनिकीकरण व उपलब्ध होणा-या नवीन पर्यायी साहित्यामुळे कमी झाले होते. परंतु, बांबूध्ये असलेल्या दर्जेदार गुणधर्मामुळे त्याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये वाढत असलेला वापर विचारात घेता त्याचे पुनरुज्जीवन करणे, बांबू लागवडीस प्रोत्साहन / उत्तेजन देण्याची गरज यापार्श्वभूमीवर मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने यांचे अध्यक्षतेखाली दि. ८ मे २०१८ रोजी मंत्रालयात संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या परिसरात बांबू केंद्राची स्थापना करणेबाबतचा निर्णय संदर्भ क्र. १ च्या शासनाच्या पत्रान्वये कळविलेला आहे. सदर प्रकल्प / कार्यशाळेसाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर यांनी प्रकल्प अहवाल तयार केला असून संदर्भ क्र. २ नुसार कळविला आहे. प्रकल्प अहवालानुसार आवश्यक असलेला निधी रु. ३३.२१ लक्ष इतकी रक्कम संदर्भ क्र. ३ नुसार उपलब्ध करुन दिलेली आहे.

**विद्यापीठ निर्णय -**

महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेनुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या परिसरात सन २०१८-१९ या कालावधीकरीता बांबू हॅडीक्राफ्ट आणि आर्ट युनिट स्थापना करण्यास व प्रकल्प कालावधीकरीता प्राप्त रु. ३३.२१ लक्ष इतक्या रक्कमेप्रमाणे प्रकल्प राबविण्यास कार्यकारी परिषदेच्या मान्यतेच्या अधिन राहुन मा. कुलगुरु मान्यता प्रदान करीत आहेत.

प्रकल्पासाठी उपलब्ध करुन दिलेले अनुदान खर्च करतांना संदर्भ क्र. २ अन्वये नमुद प्रकल्प अहवालातील नियोजन आराखडयातील मार्गदर्शक सूचना व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी नमुद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सदर प्रकल्पासाठी डॉ. कैलास जयराम कांबळे, सहयोगी प्राध्यापक, कृषि अभियांत्रिकी प्रक्रिया विभाग, डॉ. अ.शिं.कृ.अ. व तं. महाविद्यालय, राहुरी हे मुख्य संशोधक तर डॉ. गोविंद बाबुराव यंगे, सहाय्यक प्राध्यापक, कृषि अभियांत्रिकी प्रक्रिया विभाग, डॉ. अ.शिं.कृ.अ. व तं. महाविद्यालय, राहुरी हे सह संशोधक म्हणुन काम पाहतील. सहाय्यक कुलसचिव, डॉ. अ.शिं.कृ.अ. व तं. महाविद्यालय, राहुरी हे सदर प्रकल्पासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन काम पाहतील. सदर प्रकल्पाचे तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण सहयोगी अधिष्ठाता, डॉ. अ.शिं.कृ.अ. व तं. महाविद्यालय, राहुरी यांच्याकडे राहील. तसेच संपूर्ण नियंत्रण संचालक संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे असेल.

विहीत सर्व निकषांन्वये अंमलबजावणीचे तटस्थ वार्षिक मुल्यमापन संचालक (संशोधन) यांचे स्तरावरुन करण्यात यावे व तसा मुल्यमापन तथा फलनिष्पत्ती अहवाल वार्षिक उपयोगिता प्रमाणपत्रासोबत सादर व्हावा.

सदरचा विद्यापीठ निर्णय नियंत्रक, म.फु.कृ.वि., राहुरी यांचे अनौपचारीक संदर्भ क्र. १६४-VC, दि. १४/०९/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**सही/-**
**(दिलीप पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीस्तव -**

१. सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०३२
२. संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर (महाराष्ट्र)
३. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी, अहमदनगर
४. संचालक (संशोधन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११ ००७
५. संचालक, विस्तार शिक्षण / संशोधन / शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
६. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
७. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
८. प्रकल्प अधिकारी, कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर / हाळगाव
९. विभाग प्रमुख (सर्व)
१०. सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
११. नियंत्रक / नियोजन अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
१२. उप कुलसचिव (प्रशासन) / (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
१३. अधिदान व लेखाधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
१४. सहाय्यक नियंत्रक (२/३/४), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
१५. मा. कुलगुरु / कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**(विश्वास जाधव)**
**उप कुलसचिव (प्रशासन)**

सन २०१८-१९ बांबू प्रकल्प नियोजन आराखडा

अंदाजपत्रक

| अ.क्र. | बाबनिहाय तपशील | परिणाम नग/क्षेत्र/घ.मी. | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| | अनावर्ती खर्च | | | |
| १ | बांबू क्रॉस कटिंग मशीन | १ नग | 0.25 | |
| २ | चेन स्प्लीटिंग मशीन | १ नग | 1.75 | |
| ३ | एक्स टेनल नॉट रिमूव्हर मशीन | १ नग | 0.45 | |
| ४ | स्लायवर मशीन | १ नग | 1.00 | |
| ५ | फोरसाईड प्लेनर मशीन | १ नग | 3.00 | |
| ६ | स्टिक पोलीशिंग मशीन | १ नग | 1.00 | |
| ७ | टूल ग्राईडिंग मशीन | १ नग | 0.50 | |
| ८ | व्हॅक्यूम प्रेशर ट्रीटमेंट प्लांट | १ नग | 3.50 | |
| ९ | बांबू सॅडर मशीन | ४ नग | 3.00 | |
| १० | ड्रेमेल मशीन | १ नग | 0.10 | |
| ११ | जिग सॉ मशीन | १ नग | 0.20 | |
| १२ | रूटर मशीन | १ नग | 0.15 | |
| १३ | टेबल सॉ | १ नग | 0.60 | |
| १४ | सेबर सॉ | १ नग | 0.15 | |
| १५ | बफिंग मशीन / व्हॅक्यूम क्लीनर | १ नग | 0.30 | |
| १६ | पॉलीसर | १ नग | 0.15 | |
| १७ | स्ट्रेट ग्राईडर | १ नग | 0.25 | |
| १८ | ग्राईडर | १ नग | 0.25 | |
| १९ | हॉट एयर गन | १ नग | 0.20 | |
| २० | चॉप सॉ | १ नग | 0.20 | |
| २१ | मीटर सॉ टेबल | १ नग | 0.21 | |
| २२ | लेझर मशीन | १ नग | 5.00 | |
| २३ | पीलर ड्रील मशीन | १ नग | 0.40 | |
| २४ | उपलब्ध संसाधनाची दुरुस्ती | - | 3.00 | |
| | एकूण अनावर्ती खर्च | | 25.61 | |
| | आवर्ती खर्च | | | |
| २५ | युवकांचे प्रशिक्षणावरील खर्च | | 3.00 | |
| २६ | तज्ञ प्रशिक्षकाचे मानधन | | 3.60 | |
| २७ | प्रशिक्षणाकरिता बांबू व इतर साहित्य खरेदी | | 1.00 | |
| | एकूण आवर्ती खर्च | | 7.60 | |
| | एकंदर खर्च | | 33.21 | |

उप-कुलसचिव (प्रशा.)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ
राहुरी, जि. अहमदनगर